# निम्नस्तर लिपीक(लेखा) या पदाच्या पुनः (ऑनलाईन) परिक्षेबाबत सूचना

**संदर्भ:-** दि. ०२.०९.२०१६ रोजीचे सूचनापत्र

---------

महापारेषण कंपनीच्या मुख्य कार्यालय, मुंबई व परिमंडल कार्यालयांनी प्रसारित केलेल्या अनुक्रमे जाहिरात क्र. ०३/२०१६ व ०१/२०१६ अन्वये निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांसाठी दि. ०३.०६.२०१६ रोजी घेण्यात आलेली ऑनलाईन लेखी परिक्षा रद्द करण्याबाबतचा व सदर पदाच्या ऑनलाईन परीक्षेकरीता उपस्थित असलेल्या उमेदवारांची पुनःपरीक्षा घेण्याबाबत संदर्भांकीत सुचनापत्राद्वारे जाहीर करण्यात आले होते.

२. त्याअनुषंगाने सूचित करण्यात येते की, दि. ०३.०६.२०१६ रोजी घेण्यात आलेल्या निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदाच्या ऑनलाईन परिक्षेकरीता उपस्थित असलेल्या उमेदवारांची पुनःपरीक्षा (ऑनलाईन) ही दि. ०१.१२.२०१६ रोजी घेण्यात येणार आहे.

३. **पुनः परिक्षा पत्र (Call Letter)** Download करण्याकरीता, ऑनलाईन पहाणी चाचणी (Mock Test / Demo), लेखनिक वापरण्यासाठी अपंग उमेदवारांना मार्गदर्शक तत्वे (GUIDELINES FOR PERSONS WITH DISABILITIES CANDIDATES USING SCRIBE), माहिती पुस्तिका (Information Handout) व ऑनलाईन परीक्षेस बोलविण्यात आलेल्या उमेदवारांची यादी, इ. ची लिंक सुचनापत्राच्या शेवटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. प्रवेशपत्र (Call Letter) Download करण्याकरिता शेवटी उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंक (Link) वर Click करून **"विद्यमान वापरकर्ता प्रवेश पत्र डाउनलोड करण्यासाठी येथे लॉगिन करा"** या शीर्षकाखाली आपला नोंदणी क्रमांक (Registration Number) व पासवर्ड (Password) नमूद करून प्रवेशपत्र Download करावे." तसेच, प्रवेश पत्राची प्रत उमेदवाराने नमूद केलेल्या ई-मेल पत्यावर सुध्दा पाठविण्यात येत आहे.

४. ऑनलाईन परिक्षा प्रवेशपत्र (Call Letter) Download करताना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्या संबंधी उमेदवारांनी **022-42040240, 022-42040188, 8451040126 व 7507794444** या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा अथवा callletter_helpdesk@mahatransco.in या ई-मेल पत्त्यावर आपली समस्या नोंदवावी /पाठवावी. सदर ई-मेल हा दि.२९.११.२०१६ (१४.०० वाजेपर्यंत) कार्यरत राहील.

५. दि. ०३.०६.२०१६ रोजी घेण्यात आलेल्या ऑनलाईन परिक्षेकरीता उपस्थित असलेल्याच उमेदवारांना पुनः (ऑनलाईन) परिक्षेस बोलविण्यात येत आहे. पुनः (ऑनलाईन) परिक्षेस उमेदवारांना बोलविण्यापुर्वी त्यांच्या पात्रतेची म्हणजेच वय, शैक्षणिक अर्हता इ. बाबतची पडताळणी करण्यात आलेली नाही. सबब, उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेकरीता हजर होण्यापुर्वी जाहिरातीत नमूद केलेल्या विहित शैक्षणिक अर्हता, वय, प्रमाणपत्रे इत्यादी बाबी धारण करत असल्याची खात्री करावी.

**पुनः (ऑनलाईन) परिक्षेस हजर राहण्याबाबतच्या सुचना:-**

६. ऑनलाईन परीक्षेस हजर होताना उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहिल अन्यथा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१) लेखी परिक्षेस उपस्थित राहण्याबाबत महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध call letter.

२) खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्रांपैकी कोणत्याही एका ओळखपत्राची **मूळ (Original)** व एक फोटोकॉपी सादर करावी. **ओळखपत्राची मूळ प्रत आवश्यक राहील रंगीत प्रत Colour Copy ग्राह्य धरली जाणार नाही.** उमेदवारांचे परिक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव,

आडनाव हे छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव पेक्षा वेगळे असेल अशा उमेदवारांना परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

*"पॅन कार्ड (PAN Card) / पासपोर्ट (Passport) /वाहन परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter"s Card) / अलीकडचे छायाचित्र असलेले बँकेचे पासबूक (Bank Passbook with photograph) / राजपत्रित अधिकाऱ्याने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / लोकप्रतिनिधिने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / मान्यताप्राप्त महाविद्यालय / विद्यापिठाकडील अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र (valid recent Identity Card issued by a recognized college / university) / छायाचित्र असलेले आधार कार्ड (Aadhar card with a photograph) / कर्मचारी ओळखपत्र (Employee ID) / अलीकडचे छायाचित्र असलेले बार काऊनसीलचे ओळखपत्र (Bar Council Identity card with photograph)"*

**3) ओळखपत्र तपासणी:-**

परिक्षा केंद्रांवर /परिक्षा सभागृहात उमेदवारांच्या परीक्षा पत्राची (Call letter), मूळ छायाचित्र ओळखपत्राची तपासणी करण्यात येईल. उमेदवार स्वत:ची ओळख सिध्द करण्यास असमर्थ ठरल्यास अशा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

**४) महिला उमेदवारांसाठी:-**

महिला उमेदवारांचे परिक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव व छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव हे एकसमान असणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांचे परिक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव हे छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव पेक्षा वेगळे असेल अशा महिला उमेदवारांना परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

५) ऑनलाईन परिक्षेसाठी विहीत केलेल्या वेळेनंतर कोणत्याही कारणास्तव उशिराने हजर होणाऱ्या उमेदवारास परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

६) परिक्षा केंद्रावर भरती प्रक्रियेसंबंधीच्या विविध औपचारिकता पूर्ण करण्याच्या दृष्टीने अर्जदाराने परीक्षा पत्रात (Call letter) नमूद केलेल्या वेळेच्या आधीच परिक्षाकेंद्रावर हजर राहणे अपेक्षीत आहे.

७. उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेस स्वत:च्या जोखीमवर उपस्थित रहावे. महापारेषण कंपनी कोणत्याही प्रकारच्या दुखापतीस अथवा हानीस जबाबदार राहणार नाही.

- **पुन:परिक्षे (ऑनलाईन टेस्ट) करिताचे प्रवेशपत्र व ऑनलाईन पाहणी चाचणी (Mock Test/Demo)Download करण्याकरिता येथे Click करावे.**
- **लेखनिक वापरण्यासाठी अपंग उमेदवारांना मार्गदर्शक तत्वे / GUIDELINES FOR PERSONS WITH DISABILITIES CANDIDATES USING SCRIBE**
- **माहिती पुस्तिका (Information Handout) Download करण्याकरिता येथे Click करा**
- **पुन: परीक्षेस (ऑनलाईन टेस्ट) बोलविण्यात आलेल्या उमेदवारांची यादी**

**ठिकाण: मुंबई** **सही/-**

**दि. १७.११.२०१६** **मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

******